# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** महात्मा फुले चौक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1262 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/11/2024 16:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | ४२० |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ४०६ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६८ |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | 120-B |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 01/12/2018
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/01/2024
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/11/2024 **Time (वेळ):** 15:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/11/2024 16:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बी/1305, कोणार्क अपार्टमेंट,परेडाईज समोर, बिर्ला कॉलेज र,कल्याण पश्चिम, जि ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र कौतिक तायडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1961

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बी/1305, कोणार्क अपार्टमेंट,परेडाईज समोर, बिर्ला कॉलेज र,कल्याण पश्चिम, जि ठाणे,महात्मा फुले चौक,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बी/1305, कोणार्क अपार्टमेंट,परेडाईज समोर, बिर्ला कॉलेज र,कल्याण पश्चिम, जि ठाणे,महात्मा फुले चौक,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9923316999

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मन्सुर उमर अंतुले | | | 1. कल्याण,महात्मा फुले चौक,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मन्सुर उमर अंतुले याची पत्नी | | | 1. कल्याण,महात्मा फुले चौक,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | बाबा रोहे नोकर | | | 1. कल्याण,महात्मा फुले चौक,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 20,00,000/ लाख रुपये | 2,000,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी रविंद्र कौतिक तायडे, वय 63 वर्षे, व्यवसाय-सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रा. बी/1305, कोणार्क अपार्टमेंट, पॅरेडाईज समोर, बिर्ला कॉलेज रोड, कल्याण पश्चिम, जि. ठाणे, मो.नं.9923316999 फिर्याद लिहुन देतो की,
मी वरील ठिकाणी कुंटुबासमवेत राहतो. मी महाराष्ट्र पोलीस दलात 38 वर्षे सेवा पुर्ण करुन सन 2018 साली नियमित वयोमानानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बाजारपेठ पोलीस स्टेशन, कल्याण (प.) येथुन सेवानिवृत्त झालो आहे. माझा कल्याण बाजारपेठ पोलीस ठाण्यात नोकरीचा कालावधी सन 2013 ते सन 2014 पोलीस निरीक्षक गुन्हे व 26/11/2017 ते 30/11/2018 पावेतो वरिश्ठ पोलीस निरीक्षक म्हणुन असा आहे.
सन 2013 ते सन 2014 मध्ये मी बाजारपेठ पोलीस ठाणेचे आस्थापनेवर असताना रियल ईस्टेट एंजट म्हणुन काम करणार अशरफ शेख नावाचा इसम मो.नं.8850570317 हा नेहमी कामानिमीत्त पोलीस ठाण्यात येत होता. तो व्यवसायिक कामानिमीत्त येत असल्याने त्याचेशी माझी ओळख झाली, त्यानंतर अशरफ शेख याने त्याचे खास ओळखीचा व विश्वासातील बिल्डींग कन्स्ट्रक्शन व जमीनीची खरेदी विक्रीचे व्यवहार करणारा मन्सुर उमर अंतुले याचेशी ओळख करुन दिली. मुदतीत अंतुले यांने माझा मोबाईल नंबर स्वताः कडे घेतला व मला आपले मोबाईल नंबर 9323549508, 9326519319 असे नंबर दिले, त्यामुळे अधुन मधुन आमचे फोनवर बोलणे व्हायचे. त्यातुन त्याने सन 2018 मध्ये मी आजारी असताना मन्सुर उमर अंतुल त्याचा मित्र अशरफ शेख व मन्सुर अंतुलचा भाचा (नोकर) बाबा रोहे असे मला लिलावती हॉस्पीटल, मुंबई येथे 2 ते 3 वेळा भेटावयास आले होते. त्यामुळे मी भावनिक झालो व जिव्हाळयाचे संबंध प्रस्थापित झाले. मी हॉस्पीटल मधुन घरी आल्यानंतर सुध्दा मन्सुर अंतुले, अशरफ शेख व बाबा रोहे असे दोघे व तिघे मला भेटायला यायचे. त्यात मन्सर उमर अंतुले हा त्याचे घरुन नॉनव्हेज जेवण घेवुन यायचा व मला चालण्यासाठी वॉकींक करण्याकरीता मला हात धरुन चालवत होता व आप मेरे बडे भाई है, आपके शिवाय मेरा कोई नही है असे बोलुन मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मला भावनिकपणा निर्माण करुन आपल्या उपकाराची आठवण करुन देत होता. त्यात ईद सणाचे वेळी शिरखुर्मा, बिर्याणी अश्या वस्तु मी मागणी न करता आवर्जुन घेवुन येत होता. साहजिकच अशा वर्तणामुळे मन्सुर अंतुले बद्दल माझ्या मनात कुठलाही द्वेष निर्माण झाला नाही किंवा वर्तनाबद्दल संशय आलेला नसल्याने आमचे जिव्हाळयाचे संबंध निर्माण झाले.
ऑगस्ट 2018 मध्ये मन्सुर उमर अंतुले रा.202/606, सप्तसारंगी टॉवर्स, दुधनाका, कल्याण (प.) हा नेहमीप्रमाणे माझ्या घरी आला. त्यावेळी तो थोडा विचित्र मनस्थितीत असल्याचे मला जाणवले म्हणुन मी मन्सुर काय झाले असे विचारले असता त्याने मला बहुत अर्जन्ट काम आहे, मला पैशाची गरज आहे, मुझे 20 लाख रुपये चाहिये, असे बोलला तेव्हा मी त्यास आपले मैत्रीचे संबंध आहेत ते पैशामुळे बिघडु नयेत व मी आता आजारातुन थोडा बरा झालो आहे, मला बराच खर्च झाला आहे, आणि रक्कम मोठी आहे. नुसत्या विश्वासाने असे व्यवहार करणे मला घातक वाटतात असे सांगितले असता त्याने खुपच विनंती केली मेरे पे भरोसा रखो, साहेब मै आपका छोटा भाइ हुँ असे बोलुन माझी मुरबाड येथील 20 ते 25 एकर जमीन आहे त्यापैकी काही जमीन मी तुम्हाला तुमच्या नावे करुन देईन असे आश्वासन देत होता. परंतु माझ्या जवळ तेवढे पैसे नसल्याने मी वेळ मारुन नेत राहीलो. त्यानंतरही तो पैशांचे मागणीसाठी वारंवार माझ्याकडे येत होता.

माहे सप्टेंबर 2018 मध्ये एक दिवस मन्सुर अंतुले हा त्याचे पत्नीस घेवुन माझ्या घराचे जवळ आला व पत्नीस खाली ठेवुन माझेकडे आला व सांगितले माझी पत्नी आपणास भेटण्यास आली आहे आपण खाली जावु म्हणुन मी अंतुले सोबत खाली आलो तेव्हा त्याची पत्नी खाली उभी होती. व तिने साहेब आम्हांला 20 लाख रुपये द्या, आम्ही तुमचे पैसे ठेवणार नाहीत. कोणत्याना कोणत्या रुपाने तुमचे पैसे परत करु असे मला सर्व बाजूने भावनिक केल्याने मी होकार दर्शविला व वेळ मागितला.

दिनांक 19 डिसेंबर 2018 मध्ये रात्रौ 08.00 वा. च्या सुमारास मी माझे बिल्डींगचे लॉबीमध्ये माझा मुलगा विक्रांत व ओळखीचे विजय पाटील मो.नं.9967447044, अजित चौहान मो.नं.9730441111 असे बोलत असताना अचानक मन्सुर अंतुले त्याची पत्नी व भाचा बाबा रोहे असे आम्ही बसलेल्या ठिकाणी आले. व काही न बोलता मन्सुरची पत्नी हीने साहब कुछ भी करो, 20 लाख रुपये दो. असे बोलण्याने मी थोडा भावनिक होवुन काही प्रसंग असेल म्हणुन प्रसंगातुन बाहेर काढण्यासाठी मी माझा मित्रांकडुन काही रक्कम घेवुन व शेतीच्या उत्पन्नातुन जी रक्कम रोखीने आली ती, व पत्नीने व्यवहारातुन साठवुन ठेवलेली रक्कम अशी एकत्र करुन रोख रक्कम 20,00,000/- रुपये (20 लाख रुपये) रक्कम वरील लोकांच्या समक्ष मन्सुर उमर अंतुले याचे हातात दिली ती रक्कम त्याचे पत्नीने जागीच मोजुन स्वतःचे ताब्यात घेतली. त्यावेळी मन्सुर अंतुले याचा भाचा बाबा रोहे हा त्यांचेसोबत तेथे हजर होता. मी पैसे दिल्यानंतर मन्सुर अंतुले, त्याची पत्नी व भाचा बाबा रोहे यांना सक्त वाॅर्निंग देवुन सांगितले की, ‘‘मै बिमार हू, दुसरोंसे पैसा लेकर आपको दिया है, मुझे तिन महिनेमे पैसा वापस कर दो.’’ त्यावेळी मन्सुरचे पत्नीने टाईम पे पैसा वापस करेंगे, भरोसा रखो असे सांगुन निघुन गेले.

मला पैशाची गरज असल्याने माहे मार्च 2019 मध्ये माझे राहते बिल्डींगचे खाली मी तसेच विजय पाटील, अजित चौहान, मुलगा विक्रांत असे हजर असतांना मन्सुर अंतुले, त्याची पत्नी, त्याचा मित्र आश्रफ व भाचा बाबा रोहे हे भेटले. सदर वेळी मन्सुर अंतुले याचेकडे मी पैशाची मागणी केली तेव्हा त्याने ‘‘भाई थोडे दिन रुको माझे जमीनीचे काम चालु आहे, मेरा लडका और लडकी काम कर रहे हैं, जल्दी काम हो जायेगा, छे महिने के अंदर पैसा देता हु, भरोसा नही है तो नोटरी करके देंगे, और दो चेक भी देता हु’’ असे सांगितले. त्यावेळी मन्सुर अंतुलेची पत्नी व भाचा बाबा रोहे मो.नं.9320005015, 9326100498 यांनी आम्ही जबाबदारी घेतो थोडे दिवस वेळ द्या, त्यामुळे मी त्याचेवर विश्वास ठेवुन मी त्याचे म्हणण्यास होकार दिला.

काही दिवसांनी मी पैशासाठी आग्रह केला असता मन्सुर अंतुले यांने मला अँडव्हान्स चेक देतो म्हणुन सांगितले. म्हणुन दिनांक 26 जुन 2019 रोजी मी मन्सुर अंतुलेच्या घरी गेलो असता त्याठिकाणी त्याचा मुलगा षाहीन, मन्सुर अंतुलेची पत्नी व अशरफ शेख मो.नं.8850570317 असे हजर होते. त्याचे उपस्थितीत मला स्टेट बॅक ऑफ इंडिया या बॅकेचे खाते क्र. 65176601281 चे 10,00,000/- रूपयाचे दोन चेक दिले व मुलगा शाहीन व मन्सुर अंतुलेची पत्नी यांनी सांगितले की, साहेब आम्ही जरुर पडल्यास शिरगाव, ता.मुरबाड येथील सव्र्हे नं.239, 240, 243, 242, 245, 229, 246 असे बनावट असलेले कागदपत्र दाखवुन त्यापैकी काही जमीनीचे कागदपत्रं तयार करुन आम्ही तुम्हाला देवु ही जबाबदारी आमची आहे तसेच इतर अधिकारी यांचेही पैसे मन्सुर उमर अंतुले यांनी घेतलेले आहेत त्यांना सुध्दा घरे व जमीन द्यावयाची आहेत, असे सांगितले. त्यावेळी मला असे जाणवले की मन्सुर अंतुले याची पत्नी, बाबा रोहे असे लोकांना फसविण्याबाबतचा कट एकत्र आखत असावेत असे त्यांचे वर्तनावरुन जाणवत होते व मन्सुरचा मुलगा शाहीन यांने सांगितले की, इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन सुध्दा वडील मन्सुर अंतुले यांनी जमीन व घरे देण्यासाठी पैसे घेतले आहेत याची कबुली दिली, त्यामुळे माझी खात्री झाली की, मन्सुर उमर अंतुले, त्याची पत्नी, बाबा रोहे व इतर यांनी लोकांचा विश्वास संपादन करुन भावनिक वातावरण तयार करुन एकमताने, एकविचाराने, एकमेकांचे सहाय्याने पुर्ण विचाराअंती कट रचुन फसवणुक करुन ठकवणुक केलेली आहे. परंतु त्याबाबत माझेकडे कोणतीही माहिती नव्हती.

त्यानंतर मन्सुर उमर अंतुले पैसे देण्याचे टाळु लागला व माझी कट करुन फसवणुक केली हे लक्षात आल्याने ज्या सर्वे नंबरच्या जमिनीपैकी कोणती जमिन मला देणार आहे हे दाखविण्यासाठी मी, अजित सज्जन सिंह चौहान, रा. गोदरेज हील, खडकपाडा, कल्याण (प),  अनिरुध्द जगदिश जाधव, रा. राये, खडवली व मन्सुर उमर अंतुले, बाबा रोहे असे आम्ही शिरगाव, ता.मुरबाड येथील जमिनीजवळ गेलो, परंतु तो दाखवत असलेल्या जमिनीबाबत मला संशय वाटल्याने किंवा जमिन वादग्रस्त असल्याचा संशय आल्याने मी मन्सुर यास मला देत असलेली जमीन कोणत्या सर्वे नंबरची व गटाची आहे? ती मुळ जमीनीचे मालक माझे समक्ष हजर ठेवुन खात्रीने कोणती जागा देणार ते दाखव व त्या जमिनीचा तुझ्या नावाने तयार झालेला सातबारा, 8 अ व फेरफार हे कागदपत्रे दाखवुन जरुर पडल्यास पोटखत असे कागदपत्रे दाखविणेबाबत सांगितले असता मन्सुर कावराबावरा होवून वेळ मारुन नेण्याचे उद्देशाने मी

योग्य त्या अधिकारी यांचेकडुन कागदपत्र मिळवुन तुम्हांला सांगतो असे सांगितले व वेळ मारुन नेली असे त्याने दोन ते तीन वेळा केले.
वरील सर्व प्रकार मन्सुर अंतुले याने करुन सुध्दा माझ्याकडुन विश्वासाने घेतलेली रक्कम परत न करता अँडव्हान्स चेक देवुन ते बॅकेत मी सांगितल्याशिवाय बॅकेत टाकु नये असे सांगुन माझी कट करुन, कट रचुन, अन्यायाने फसवणुक करीत असल्याचे व माझे आर्थिक नुकसान करीत असल्याचे लक्षात आल्याने मी वेळोवेळी फोन केले, व्हाँटसअँपवर मॅसेज व काँल करुन ही त्याला प्रतिसाद दिलेला नाही व दाद दिली नाही. म्हणुन मी माझ्याप्रमाणे अजुन कोणाची फसवणुक झाली आहे काय? अशी माहिती घेता लक्ष्मण तांबे, पोलीस निरीक्षक, सेवानिवृत्त यांना बाळु गावडे यांचे साईटवर घर किंवा जमीन देतो असे सांगुन सन 2018 पासुन जानेवारी 2024 पावेतो त्यांना घर किंवा जमिन दिलेली नाही व त्यांना दिलेले चेक सुध्दा न वटल्याचे मला समजले तसेच त्याचे फोन सुध्दा बाँल्क (ठसवबा) केल्याचे समजले म्हणुन खात्री केली असता पोलीस निरीक्षक लक्ष्मण तांबे यांनी त्यास दुजोरा दिला असुन पैसे मागण्यास गेले असता लक्ष्मण तांबे यांचे विरुध्द तक्रारी अर्ज केल्याचे सांगितले. तसेच इतर बऱ्याच लोकांची अशाच प्रकारे कट रचुन फसवणुक केली असल्याचे माहिति समजली आहे. या कटात सामील असलेल्या मन्सुर अंतुले सोबतच्या कट रचणाऱ्या लोकांच्या स्वभावाची खात्री झाल्याने कायदेशिर मार्गाने गेल्याखेरीज न्याय मिळणार नाही व माझी रक्कम मला परत मिळणार नाही. कारण मन्सुर अंतुले, बाबा रोहे व मन्सुरची पत्नी हे नेहमी कायदेविशयक लोकांच्या संपर्कात राहुन कायदयातील पळवाटांचा फायदा घेवुन माझ्याशी दगा फटका करण्याची शक्यता वाटल्याने मला त्याचे विरुध्द रीतसर फिर्याद दाखल केल्याशिवाय पर्याय नाही.
तरी माहे डिसेंबर 2018 ते जानेवारी 2024 पावेतो मन्सुर उमर अंतुले, त्याची पत्नी, त्याचा नोकर भाचा बाबा रोहे यांने माझ्या घरी येवुन मला भावनिक करुन माझा अन्यायाने विश्वास संपादन करुन आपसात एकमेकांच्या विचाराने व सहाय्याने पुर्ण विचाराअंती कट रचुन कटाची पुर्तता करण्यासाठी रोख रक्कम शेतकऱ्यांना देण्यासाठी रोखच रक्कम पाहिजे त्याशिवाय पुढील शेतकरी जागा देणार नाही, असे सांगुन बिंबवुन माझ्याकडुन रोखीने 20,00,000 /- लाख रुपये (20 लाख रुपये) स्वीकारुन पैसे परत न करता जमीन देण्याचे आमिश दाखवुन भासवुन टायटल क्लिअर नसलेली बनावट जमीन दाखवुन माझी रक्कम रुपये 20,00,000/- स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वापरुन माझी तसेच इतर पोलीस अधिकारी व इतर लोकांची माझ्याप्रमाणे कट रचुन कटाचा उद्देश साध्य करुन अन्यायाने विश्वासघात करुन ठकवणुक व फसवणुक करुन माझे रक्कमेचा अपहार केला आहे. म्हणुन माझी मन्सुर उमर अंतुले, त्याची पत्नी व भाचा बाबा रोहे (नोकर) यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील जबाब माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

DNYANESHWAR DASHRATH SABLE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DNYANESHWAR DAS

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**